महाराष्ट्र शासन

उच्च न्यायालय प्रकरण

क्र.अपंग २००९/प्र.क्र.५२/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक १५ मे, २००९

प्रति
सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
सर्व संचालक,
कुलसचिव, सर्व विद्यापीठे

विषय - जनहित याचिका क्र.१३९/०६ व इतर जनहित याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे अपंग आरक्षणाबाबतचे आदेश

महोदय/महोदया

दि.३१.१२.२००८ अखेर अपंगांसाठी उपलब्ध असलेली पदे ही दि.३१.१२.२००९ पर्यंत भरण्यात येतील असे प्रतिज्ञापत्र शासनाने मा. उच्च न्यायालयास सादर केले आहे. यास्तव अपंगांसाठीची सदर राखीव पदे कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.१२.२००९ पर्यंत भरणे बंधनकारक आहे. सबब, सदर प्रकरणी पुढे नमूद केल्यानुसार तातडीने कार्यवाही करुन आपला अहवाल शासनास पाठविण्यात यावा. जेणे करुन मा. प्रधान सचिव यांना एकत्रित माहिती सादर करता येईल :-

१) अपंगाची पदे कोणत्याही परिस्थितीत दि.३१.१२.२००९ पूर्वी भरली जातील याची दक्षता घ्यावी.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणारी पदे दिनांक ३१.१२.२००९ पूर्वी भरली जावीत यासाठी आयोगास आवश्यक असणारी माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी व मागणीपत्र सादर केल्याप्रमाणे पदे विहित मुदतीत भरली जातील यासाठी पाठपुरावा करावा.

३) मा. उच्च न्यायालयासमोर वादीनी अद्यापही काही संवर्गाचे अपंगासाठी पदनिश्चिती करण्यात आलेले नाही असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तेव्हा त्याप्रमाणे तातडीने तपासणी करावी व ज्या संवर्गाचे अद्यापही अपंगांसाठी पदनिश्चिती झालेली नाही त्यासाठीचा प्रस्ताव तातडीने सामाजिक न्याय विभागास १० प्रतीत सादर करावा जेणे करुन या प्रस्तावास तज्ञ समितीची मान्यता घेणे शक्य होईल.

(बा.म. राऊत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन